दैनिक **वादळ वार्ता**

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.९ एप्रिल २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २२१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 9 April 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 221 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल

**मुंबई**–कोणाचा डाऊनफॉल होईल ते वेळच सांगेल. त्यामुळे मला यावर प्रतिक्रिया द्यायची नाही, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते पार्थ पवार यांनी काँग्रेसवर टीका केली होती. यावर पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच ते राजकारणात अजून लहान आहेत, त्यामुळे मला त्यांच्यावर काही बोलायचे नाही, असेही पटोले यांनी म्हटले.शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर टीका करताना नाना पटोले म्हणाले, संजय राऊत यांना त्यांच्याच पक्षात कोणी मान्यता देत नाही, त्यामुळे आम्ही त्यांना मान्यता द्यावी असे वाटत असेल तर त्यावर मी काही प्रतिक्रिया देणार नाही.पुढे बोलताना नाना पटोले यांनी भाजपवर टीका करताना म्हटले की, धर्मामध्ये आणि भाषेत भाजपने जे वाद निर्माण करून ठेवले आहेत. या मुंबईत देशाच्या आर्थिक राजधानीत गुजराती मराठी वाद निर्माण होणे यामागे भाजप आहे. राज्याला खऱ्या अर्थाने आपले राज्यातले मुख्यमंत्री नाही चालवत. गुजरातचे लोक चालवतात. काँग्रेसच्या काळात असा कुठलाही वाद कधीही झाले नाही.

# राज्यातील बांधकाम क्षेत्रासाठी मोठा दिलासा उत्खनन रॉयल्टी,बिनशेती प्रक्रिया होणार डिजिटल

## बिनशेतीची डिजिटल प्रक्रिया आता १० दिवसांत–महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

बांधकाम करताना उत्खनन करण्यात आलेले गौण खनिज त्याच जागी वापरले तर त्याला रॉयल्टी माफ करण्यात आली असून, बिनशेतीसाठी आता जिल्हाधिकारी यांच्याकडे जाण्याची आवश्यकता नसून ही प्रक्रिया दहा दिवसात ऑनलाईन करण्यात येणार आहे. याबरोबरच महापालिका आणि मिळकतपत्रावरील नोंदीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याचे आश्वासही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.राज्यभरातील बांधकाम व्यावसायिकांना भेडसावणारे प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात क्रेडाईच्या (CREDSAI) प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. बांधकाम क्षेत्राला गती देण्यासाठी आणि प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

बांधकाम करताना होणाऱ्या खोदकामासाठी आकारल्या जाणाऱ्या रॉयल्टीबाबत क्रेडाईने मांडलेले प्रश्न महसूलमंत्र्यांनी मार्गी लावले आहेत. सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे, उत्खननानंतर निघालेले गौणखनिज जर त्याच बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी वापरले जात असेल, तर त्यावर कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. यामुळे प्रकल्पाचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच, रॉयल्टी भरण्याची प्रक्रिया आता अधिक सुटसुटीत करून ती सहा महिन्यांच्या कालावधीसाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बिगरशेती (NA) परवान्यासाठी लागणारा वेळ व क्लिष्ट प्रक्रिया कमी करण्यासाठी महसूल विभागाने कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. एनएची संपूर्ण पद्धत येत्या दहा दिवसांत पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. यामुळे गृहप्रकल्पांच्या कामात येणारे प्रशासकीय अडथळे दूर होतील.पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी राबवलेली 'डिजिटल ट्रेकिंग प्रणाली' यशस्वी ठरली आहे. हीच पारदर्शक प्रणाली आता राज्यभर राबवण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. याशिवाय, कोणत्याही कागदपत्राचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यास त्याची नोंद तातडीने मिळकत पत्रिकेवर (Property Card) झालीच पाहिजे, ही क्रेडाईची मागणीही मंत्र्यांनी तत्वतः मान्य केली आहे.

या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली गतिमान झाल्या आहेत. याचाच भाग म्हणून मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे आणि जमाबंदी आयुक्त रविंद्र बिनवडे यांच्यासोबत स्वतंत्र बैठकांचे आयोजन करण्यात आले असून, तांत्रिक बाबी लवकरात लवकर सोडवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील रिअल इस्टेट क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असा विश्वास क्रेडाईकडून व्यक्त करण्यात आला.



# केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे भीषण अपघातात निधन

## कर्तव्यदक्ष अधिकारी हरवला; महसूल विभागावर शोककळा

दैनिक वादळ वार्ता

**रेणापूर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज येथील तहसीलदार राकेश गिड्डे यांचे आज पहाटे लातूर जिल्ह्यातील रेणापूरजवळ झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुर्दैवी निधन झाले. या अचानक घडलेल्या घटनेमुळे महसूल विभागासह बीड आणि लातूर जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

**अपघाताचा घटनाक्रम**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, तहसीलदार राकेश गिड्डे हे आपल्या खाजगी वाहनाने प्रवास करत असताना रेणापूर परिसरात त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की वाहनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

**कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची अखेर**

राकेश गिड्डे हे एक कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि मितभाषी अधिकारी म्हणून ओळखले जात होते. केज तहसील कार्यालयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले होते. सर्वसामान्य नागरिकांशी सुसंवाद ठेवून त्यांनी प्रशासनात वेगळी छाप निर्माण केली होती.



**प्रशासनाची हानी**

राकेश गिड्डे यांच्या रूपाने प्रशासनाने एक तरुण व कार्यक्षम अधिकारी गमावला आहे. त्यांच्या निधनाने महसूल विभागाचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे, अशा भावना विविध अधिकाऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

**सर्वत्र हळहळ**

गिड्डे यांच्या निधनाचे वृत्त समजताच बीड व लातूर जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय व मोठा आप्तस्वकीय वर्ग आहे.

## वसरणी येथे लागून शॉक लागून मृत्यू पावलेल्या रोहित यादव यांच्या कुटुंबाला एक लाखाची मदत–आ.आनंदराव पाटील बोंढारकर

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड शहरालगत असलेल्या वसरणी येथील काम करत असताना रोहित यादव चौधरी यांना अचानक शॉक लागल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला होता त्यामुळे घरचा एकुलता एक असणारा करता गेल्यामुळे त्यांचे कुटुंब उध्वस्त झालं होते व त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर पसरला होता त्यामुळे नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांनी गवळी समाजाचे रोहित यादव चौधरी यांच्या कुंटुबाला एक लाखाची आर्थिक मदत देत त्यांच्या कुटुंबाला मायेची ऊब देण्याचे काम केले आहे त्यामुळे रोहित यादव चौधरी यांच्या कुटुंबाला खूप मोठा आधार मिळाला आहे एक लाखाचा धनादेश आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांनी रोहित यादव चौधरी यांच्या पत्नी व त्यांची आई यांच्याकडे स्वाधीन केला यावेळी उपस्थित तुलजेश यादव शिवसेना शहरप्रमुख नांदेड दक्षिण पिल्लू यादव शंकर पिनोजी सुहास खराणे विक्रम पाटील बामणीकर उपस्थित होते



## माजलगाव तालुक्यात बोगस कामांचा धुमाकूळ;अनुसया कन्स्ट्रक्शनवर गंभीर आरोप

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील सोन्नाथडी ते खरात आडगाव चौपाळा या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचा धक्कादायक आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अनुसया कन्स्ट्रक्शनकडून करण्यात येत असलेले हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, डुप्लिकेट साहित्य वापरून शासनाची फसवणूक केली जात असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.



स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अभियंत्यांनाही हाताशी धरून हे काम उरकले जात असून, गुणवत्ता नियंत्रणाच्या सर्व नियमांना सर्रास पायाखाली तुडवले जात आहे. रस्त्याचे काम पूर्ण होण्याआधीच त्याची अवस्था दयनीय झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांनी याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

जर त्वरित कारवाई झाली नाही, तर आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा ग्रामस्थांनी दिला असून, लवकरच निवेदन देऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मंजरथ येथे भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन–सचिन पाडमुख

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी बीड जिल्हा परिषद बांधकाम व अर्थ सभापती मा. जयसिंग भैया सोळंके हे असणार आहेत. उद्घाटक म्हणून तुळजाभवानी बँकेचे चेअरमन मा. चंद्रकांतजी शेजुळ उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन सेना महाराष्ट्र राज्याचे नेते मा. विजयदादा साळवे तसेच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मा. मंगलजी पांडे सर उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजलगाव खरेदी-विक्री महासंघाचे उपाध्यक्ष भालचंद्र पाठक (मंजरथकर) यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तसेच मंजरथ गावचे सरपंच भागवत पोहेकर व उपसरपंच काशिनाथ आळसे हे देखील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून, प्रथम बक्षीस रुपये २५,५५५ हे मा. जयसिंग भैया सोळंके यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. द्वितीय बक्षीस रुपये १५,५५५ हे माजी पंचायत समिती सदस्य मा. दीपक भाऊ साळवे यांच्या वतीने देण्यात येणार आहे. तृतीय बक्षीस रुपये ११,१११ हे माजी सरपंच तुकाराम चोरमले यांच्या वतीने, तर चतुर्थ बक्षीस रुपये ७,७७७ हे सेवा सोसायटीचे चेअरमन दत्ता आस्वले यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. याशिवाय उत्कृष्ट चढाईसाठी रुपये ३,३३३ हे माजी उपसरपंच मा. निवृत्ती खरात यांच्या वतीने, तसेच उत्कृष्ट पकडीसाठी रुपये ३,३३३ हे माजी ग्रामपंचायत सदस्य मा. मारुती काळे यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. या भव्य स्पर्धेत जास्तीत जास्त कबड्डी संघांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाचे अध्यक्ष सचिन पाडमुख यांनी केले आहे.



# आष्टीत वर्दळीच्या ठिकाणी देशी दारू दुकान

## स्थलांतर न झाल्यास उग्र आंदोलन वंचितांच्या वतीने इशारा

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी । प्रतिनिधी**

येथील बसस्थानक परिसरात सुरू असलेले देशी दारूचे दुकान तात्काळ हटवून अन्यत्र स्थलांतरित करावे, अन्यथा उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे आष्टी शहर अध्यक्ष गणेश वैध यांनी दिला आहे. यासंदर्भात जालना जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.बसस्थानकाला लागून पंढरपूर ते शेवगाव राष्ट्रीय महामार्गावरील टीपू सुलतान चौकाजवळ हे दुकान सुरू असून, हा भाग दिवसभर अत्यंत वर्दळीचा असतो. विशेष म्हणजे, या दुकानापासून अवघ्या २०० फूट अंतरावर पी. ए. इमामदार विद्यालय आहे. विद्यार्थ्यांना रोज या दुकानासमोरून जावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा व वातावरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.तसेच, अवघ्या १०० फूट अंतरावर विविध समाजांच्या स्मशानभूमी असून, अंत्ययात्रा या मार्गानेच जातात. अशा वेळी दुकानासमोर मद्यपान करणाऱ्यांची गर्दी व होणारा गोंधळ हा संतापजनक प्रकार असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. या परिसरात बसस्थानक, व्यापारी आस्थापना, राष्ट्रीय महामार्ग व शैक्षणिक संस्था असल्याने तो अत्यंत संवेदनशील मानला जातो. तरीही अशा ठिकाणी दारूचे दुकान सुरू राहणे हे गंभीर दुर्लक्ष असल्याचा आरोप करण्यात आला आहे.दरम्यान, परिसरात वारंवार होणारे वाद, गोंधळ आणि अशांततेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन दुकानाचे स्थलांतर करावे, अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र व निर्णायक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा गणेश वैध यांनी दिला आहे.



# संपादकीय

## सार्वजनिक आरोग्यसेवेचे दुखणे

एका शेतकरी कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचे निदान झाले. सुरुवातीला त्यांच्याकडे असलेल्या बचतीतून खासगी दवाखान्यात तपासण्या केल्या. उपचारांसाठी सरकारी दवाखान्यातून औषधे घेतली; पण ती कधी मिळायची, कधी नाही. म्हणून मग ते खासगी दुकानातून औषधे घेऊ लागले. पण खर्च वाढू लागला. बचतीचे पैसे संपले. महिला बचत गटातून कर्ज काढून उपचार सुरू ठेवले; पण तपासणी, डॉक्टरांची फी, औषधांचा महिन्याला दोन-अडीच हजाराचा खर्च परवडेना. मग नाईलाजाने उपचार मध्येच थांबवले...देशातील सर्वांत प्रगत, अर्थसंपन्न, सर्वाधिक आर्थिक योगदान देणारे, वैद्यकीय तंत्रज्ञानात प्रगत अशी अनेक बिरूदे आपण महाराष्ट्रासाठी मिरवत आहोत. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी व आरोग्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात ' मेडिकल टुरिझम ' विकसित करणार असल्याचे घोषित केले. अर्थात हा विचार म्हणून चांगलाच आहे. इतर देशांच्या तुलनेत आपले राज्य याबाबतीत पुढे आहे, हे यातून स्पष्ट होते; पण आपल्या राज्यातील जनतेला प्राथमिक उपचारासाठी कर्जबाजारी व्हावे लागणे, साध्या-साध्या उपचारांसाठी या दवाखान्यातून त्या दवाखान्यात खेटा घालायला लागणे किंवा सरकारी दवाखान्यातून उपचार न मिळता नाईलाजास्तव भरमसाठ पैसा मोजून खासगी रुग्णालयातून उपचार घ्यावे लागणे, हे योग्य नाही.महाराष्ट्राने आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची प्रगती साधल्याबाबतचे आकडे नेहमीच सांगितले जातात. राज्यात संस्थात्मक प्रसूती वाढल्या, माता आणि बाल मृत्युदर कमी झाला, हे काही अंशी वास्तव असले, तरी वास्तवाची दुसरी बाजूही नाकारता येणार नाही. काही ठिकाणी अजूनही घरी प्रसूती होतात आणि 'टार्गेट' पूर्ण करण्यासाठी 'संस्थात्मक' प्रसूती म्हणून दाखविल्या जातात. कुपोषण, ॲनिमिया आणि असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत असताना, आरोग्य व्यवस्था ही केवळ प्रसूतीच्या सेवा देण्यासाठीच मर्यादित आहे का, असा प्रश्न पडतो.सार्वजनिक आरोग्य यंत्रणेचा मुख्य उद्देश प्रतिबंधात्मक पातळीवर उपाययोजना करणे आहे. या स्तरावर चांगले काम असेल तरच अधिकाधिक लोकांना त्याचा फायदा मिळेल. साधारण ७० टक्क्यांपेक्षा अधिक जनतेला प्राथमिक सेवांचीच गरज असून, मर्यादित लोकसंख्येला मोठ्या आजारांवरील उपचारांची आवश्यकता आहे; पण प्रत्यक्ष आजार वाढल्यावर उपचार करू, असे उलट धोरण राबवले जात आहे.आज अनेक महत्त्वाच्या सेवांचे सार्वजनिक-खासगी भागीदारीतून खासगीकरण केले आहे. त्यामुळे आधी मोफत मिळणाऱ्या सेवांसाठी आता पैसे मोजावे लागत आहेत. उदा. गरोदरपणाच्या कालावधीत किमान दोन सोनोग्राफी व ॲनॉमली स्कॅन केले जाते. यासाठी साधारण अडीच-तीन हजारांचा खर्च होतो. पण ही सोनोग्राफी खासगी केंद्रांतून करून त्यांना शासनाकडून ८०० - १००० रुपये रक्कम दिली जाते. उर्वरित खर्च त्या कुटुंबावर पडतो. स्त्रीरोग तज्ज्ञ नाही म्हणून खासगीत उपचार, लॅब व तपासण्या बाहेरून, पुरेशी औषधे मिळत नाहीत म्हणून ती बाहेरून; मग कोणत्या सेवा मोफत मिळाल्या? राज्यात एका वर्षात साधारण चार लाख २५ हजारपेक्षा अधिक गरोदर मातांची नोंदणी होते. यासाठी फक्त सोनोग्राफीसाठी साधारण १०६ कोटी २५ लाख एवढा खर्च वर्षाला खासगीत जातो. वास्तविक हाच निधी वापरून प्रत्येक तालुक्यात एक सोनोग्राफी सेंटर सुरू करणे शक्य आहे. तसे झाल्यास रुग्णांवरील अतिरिक्त खर्चाचा ताण कमी होईल. सोबतच, सरकारी आरोग्य यंत्रणेच्या बळकटीसही त्यामुळे सहाय्य होईल.अशीच स्थिती सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चालवल्या जाणाऱ्या लॅबचेही आहे. यातूनही रुग्णांची लूटच होत आहे. राज्यात उच्च रक्तदाब, मधुमेहासारख्या असंसर्गजन्य आजारांचे वाढते प्रमाण मोठे आव्हान ठरत आहे. या आजारांवर दीर्घकालीन किंवा कायमस्वरूपी उपचारांची आवश्यकता असते. उच्च रक्तदाब किंवा मधुमेहाच्या एका रुग्णाला उपचारासाठी महिन्याला सरासरी १२०० ते १५०० रुपये खर्च येतो. सरकारी दवाखान्यात असंसर्गजन्य आजारांची पुरेशी औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णांना ती नियमित मिळतीलच, याची खात्री नाही. त्यामुळे लोक सरकारी आरोग्य व्यवस्थेपासून दूर जात आहेत. तशा स्थितीत विविध आरोग्य तपासण्या, विविध उपचार यांसाठी त्यांना खासगी व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत आहे.सद्यस्थितीत सरकारी आरोग्य व्यवस्थेत अनेक पातळ्यांवर कमतरता दिसून येते. डॉक्टर, परिचारिका, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावर आरोग्य यंत्रणा चालवण्याचा ताण येतो. वारंवार उद्भवणारा औषधांचा तुटवडा आणि इतर संसाधनांची कमतरता मोठ्या प्रमाणावर दिसते. यासोबतच लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात आरोग्य सुविधांची वाढ, सुधारणा होत नाही. परिणामी, ठरावीकच रुग्णालयांवर रुग्णसंख्येचा ताण वाढतो. तसेच ग्रामीण भागात आरोग्यकेंद्रे गावांपासून लांब असल्यामुळे लोक त्या ठिकाणी जाण्याचे टाळतात व खासगीकडे वळतात. सरकारी आरोग्य व्यवस्था अशी कमकुवत असल्यामुळे, खासगी व्यवस्थेला पसरायला आणखी वाव मिळतो.खासगी आरोग्यसेवा ही जनतेची 'निवड' नसून 'अपरिहार्यता' झाली आहे. खासगी रुग्णालयांमध्ये सेवा तत्काळ मिळत असल्या, तरी दरनियंत्रणाचा अभाव, अनावश्यक तपासण्या आणि महागड्या औषधांमुळे तेथे अतिरिक्त खर्च होतो. परिणामी, बचत खर्चून, कर्ज घेवून किंवा इतर मुलभूत गरजा कमी करून हे उपचार घ्यावे लागतात. मोठ्या उपचारांसाठी 'महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य'सारखी विमा योजना राबवली जात असली, तरी या योजनेत मुख्यतः रुग्णालयातील उपचार येतात. प्रत्यक्षात जास्त खर्च हा बाह्यरुग्ण सेवा, औषधे आणि तपासण्यांवर होतो. ते विम्याच्या कक्षेत येत नसल्याने, विमा असूनही लोकांचा आर्थिक भार कमी होत नाही. अशा अनियंत्रित व्यवस्थेचा परिणाम म्हणून भारतात दरवर्षी आरोग्य खर्चामुळे सुमारे पाच ते सहा कोटी, तर महाराष्ट्रात दरवर्षी ४० ते ६० लाख लोक गरिबीत ढकलले जात असल्याचे विविध अभ्यासातून समोर आले आहे. राज्यात आजही एकूण आरोग्य खर्चाच्या ४० ते ५५ टक्के रक्कम रुग्णाला स्वतःच्या खिशातून भरावी लागते. म्हणूनच आरोग्य सेवांवरील रुग्णाच्या खिशातून होणाऱ्या खर्चाचे प्रमाण वाढत आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे.महाराष्ट्राने आरोग्य क्षेत्रात प्रगती साधली असली, तरी ती सर्वांसाठी समान नाही. राज्यात आरोग्य सेवांची 'असमानता' हे सर्वांत मोठे आव्हान आहे. शहरात आधुनिक आरोग्य सुविधा सहज उपलब्ध आहेत, तर ग्रामीण आणि आदिवासी भागात मूलभूत सेवाही अपुऱ्या आहेत. परिणामी, स्थलांतरित कामगार, गरीब कुटुंबांना आरोग्य सेवांचा लाभ कमी प्रमाणात मिळतो. त्यामुळे 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना अजूनही अपूर्ण आहे.राज्यात ' सर्वांना समान आरोग्य सेवा ' मिळावी, यासाठी प्राथमिक आरोग्य सेवांचे सक्षमीकरण अत्यावश्यक आहे.

# काळेगाव घाट येथे अखंड हरिनाम सप्ताह,ज्ञानेश्वरी पारायण,ज्ञानयज्ञ भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

## मौजे काळेगाव घाट येथे भक्तीचा जागर;विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील काळेगाव घाट येथील समस्त ग्रामस्थ मंडळ व तरुण मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा ज्ञानयज्ञ आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचेभव्य आयोजन करण्यात आले आहे.दि.९ एप्रिल ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडणार असून,परिसरा तील भाविकांमध्ये भक्ती चे वातावरण निर्माण झाले आहे.कथा प्रवक्ते आणि दैनंदिन कार्यक्रम यामध्ये सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे ह.भ.प. श्री.पांडुरंग महाराज शिंपले गंगाखेडकर यांच्या रसाळ वाणीतून होणारी भागवत कथा होय.दैनंदिन कार्यक्रमा मध्ये पहाटे काकड आरती,विष्णू सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण,दुपारी भागवत कथा आणि रात्री हरिपाठासह नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.

कीर्तन महोत्सवाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत नामवंत महाराज मंडळींचे कीर्तन सेवा होणार आहे.दि.९ एप्रिल २०२६ अखंड हरिनाम व भागवत कथा आयोजन निमित्त ह.भ.प.पांडुरंग महाराज शिंपले यांची कथा सकाळी १० ते १२ व रात्री ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज गिरी यांचे कीर्तन होणार असून दि. १० एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प.सौ शारदाबाई गालफाडे,दि.११ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प. दिपक महाराज मेटे लव्हुरीकर,दि.१२ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प. हनुमंत महाराज कोरे तांदुळवाडीकर,दि.१३ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प.विजयकुमार पोपळे,दि.१४ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प. तिळेकर महाराज आळंदीकर,दि.१५ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प. सरस्वतीताई स्वामी अंबाजोगाईकर,दि.१६ एप्रिल २०२६ रोजी ह.भ.प.श्री महंत भगवान महाराज शास्त्री मठ संस्थान वरपगाव यांचे . काल्याचे कीर्तन व महाप्रसाद सोहळ्याची सांगता गुरूवार,दि.१६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होईल.त्यानंतर उपस्थित सर्व भाविकां साठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या मंगलमय सोहळ्यासाठी नामवंत गायक,वादक आणि मृदंगमणी आपली सेवा अर्पण करणार आहेत. काळेगाव घाट आणि परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या श्रवण सुखाचा आणि महा प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सौंदाणा येथे 'जागतिक आरोग्य दिन' उत्साहात साजरा; 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' उपक्रमाचा सौंदाना गावात शुभारंभ-गायके

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

सौंदाना ता.जि. बीड येथे आज प्राथमिक आरोग्य केंद्र नवगण राजुरी च्या वतीने जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून सौंदाणा ता.जि. बीड येथे 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्थांना उत्तम आरोग्याचे महत्त्व पटवून देत, गाव रोगमुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौंदाणा गावच्या सरपंच तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र नवगण राजुरी च्या टीमला सतत मदत करणारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीडजिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व कहानू गायके होते. या प्रसंगी प्राथमिक आरोग्यकेंद्र नवगण राजुरीचे आरोग्य सेवक श्री रामदास पवळ आणि आरोग्य सेविका सौ राधा जाधव बहिर सौंदाना गावच्या आशा स्वयंसेविका सौ पार्वती राजू गायके यांनी उपस्थितांना आरोग्यविषयक सखोल मार्गदर्शन केले.

आरोग्य सेवक श्री रामदास पवळ सर यांनी बदलत्या जीवनशैलीत उद्भवणारे आजार आणि त्यावर घ्यावयाची काळजी यावर भाष्य केले. तसेच सरपंच सौ जनाबाई सूर्यभान गायकवाड यांना१ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान शासनाने माझ गाव आरोग्य संपन्न गाव*या महत्वकांक्षी अभियानाचा शासन निर्णय सरपंच यांना देण्यात आला. याचे महत्त्व जिल्हास्तरावर २५ लाख विभाग स्तरावर एक कोटी आणि राज्य स्तरावर पाच कोटी अशा स्वरूपाचं बक्षीस ठेवलेला आहे तरी याची सर्व गावकऱ्यांना माहिती दिली. तसेच, आरोग्य सेविका सौ राधा जाधव यांनी माता-बाल संगोपन आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत महिलांना मोलाचे सल्ले दिले. *माझ गाव, आरोग्य संपन्न गाव मोहिमेअंतर्गत गावात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती सौंदाना गावच्या आशा स्वयंसेविका सौ पार्वती राजू गायके यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आशा स्वयंसेविका सौ. पार्वती राजू गायके यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी गावातील प्रत्येक कुटुंबापर्यंत आरोग्याचा संदेश पोहोचवण्याचे काम केले. सामाजिक कार्यकर्ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष श्री राजू गायके यांनी आरोग्य विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करून, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगितले. तसेच या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व पाहुण्यांचे श्री राजू गायके यांनी शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी गावातील सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ग्रामस्थांनी गाव स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्याची शपथ घेतली. यावेळी सरपंच सौ जनाबाई सूर्यभान गायकवाड, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष श्री गायके राजू, तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री कहानू गायके, गावच्या अशा स्वयंसेविका सौ पार्वती राजू गायके अंगणवाडीच्या शिक्षिका सौ सुरेखा शरद गायके दुसऱ्या अंगणवाडीच्या शोभा प्रदीप गायके, सीआरपी सौ शिवकन्या सुलक्षण गायके, सुंदरनानी मोरे, सौ सिंधू घोलप, आरती गायकवाड, कोमल रामू गायके, श्री गंगाधर घोलप, रामू गायके आदी प्रतिष्ठित व्यक्ती, पुरुष महिला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या कृपेने व वै ह.भ.प गिरी महाराज व ज्ञानेश्वर माऊली,सुदाम देव महाराज, गुरुवर्य शांती ब्रह्म रामहरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे व महादेव महाराज (तात्या) यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने वार शुक्रवार दि.१०/४/ २०२६ रोजी मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.


सात दिवस चालणाऱ्या या सप्ताह निमित्त गावामध्ये रोज वेगवेगळ्या नामांकित कीर्तनकारांचे अमृततुल्य असे किर्तन सेवा होणार आहेत तसेच भजन,प्रवचन,हरिपाठ व हरीजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गावामध्ये रोज गावकऱ्यांच्या वतीने व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने सप्ताह निमित्त महापंगतीचे आयोजन करण्यात आले असून रोज सकाळ व संध्याकाळ गावामध्ये वेगवेगळ्या महापंगती होणार असून परिसरातील भावीक भक्तांनी,नागरिकांनी व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.अखंड हरिनाम सप्ताह निमित्त वार शुक्रवार,दि.१७/४/२०२६ रोजी श्री गुरुवर्य ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकट स्वामी संस्थान निनगुर,आळंदी,पंढरपूर) यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होणार असून नंतर लगेचच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी तसेच गावकऱ्यांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# देवरुख येथे दीपक लिंगायत लिखितस्पर्श प्रेमाचा प्रवास : पालकत्वाचा पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

स्पर्श प्रेमाचा प्रवास : पालकत्वाचा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हॉल शिवाजी चौक येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम ख्यातनाम साहित्यिक व समीक्षक माननीय सुरेश जोशी (देवरुख) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मेजर प्रकाश पाटील (जयसिंगपूर), डॉ. महावीर मिठारी (कोल्हापूर) तसेच प्रा. क्रांती सरवनकर (मुंबई) उपस्थित होते. तसेच जि.प. सदस्य नेहा माने,डॉ. वर्षा फाटक, साहित्यिक मदनजी मोडक, जी.के. जोशी सर (लोकमान्य वाचनालय अध्यक्ष), अनिल शेठ पंदेरे ( केदारलिंग ग्रामस्थ मंडळ वांझोळे, अध्यक्ष), मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष कुष्णाले सर, संजय कोरे (मुख्याध्यापक, शिवाजी माध्यमिक विद्यालय वांझोळे), सौ. कांबळे मॅडम (मुख्याध्यापिका, दाभोळे हायस्कूल) यांच्यासह शिक्षकवर्ग, कोमसापाचे सदस्य, युवाशक्ती कोमसापचे तरुण, मठधामापूर पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच लेखकाचे




कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विद्येची देवता सरस्वती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच लेखकाच्या आजी-आजोबांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. साहित्यिक कार्यक्रमाचे औचित्य साधून पाहुण्यांचे स्वागत फुलांच्या ऐवजी पुस्तक, नोटपॅड व पेन देऊन लिहिते व्हा, वाचते व्हा हा संदेश देत करण्यात आले.

प्रास्ताविक युयुत्सु आरते यांनी केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. लेखक दीपक लिंगायत यांनी आपल्या मनोगतातून पुस्तक लेखनाचा प्रवास, उद्देश आणि तीस वर्षांच्या अनुभवाचे संचित या पुस्तकात कशा प्रकारे मांडले आहे, याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ तयार करणारे सुधीर चंद्रशेखर लिंगायत तसेच प्रूफरीडिंग करणाऱ्या कल्याणी महेश गुरव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मारलेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हेमंत शिंदे आणि अशोक लिंगायत परचुरकर यांनी प्रत्येकी १०० पुस्तके खरेदी करून समाजात वितरण करण्याचा घेतलेला पुढाकार गौरवण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित करत आजच्या काळात पालकांसाठी हे पुस्तक अत्यंत आवश्यक असून ते घराघरात पोहोचले पाहिजे, असा संदेश दिला. प्रमुख पाहुण्यांनीही पुस्तकाच्या दर्जेदार लेखनाचे कौतुक केले. माननीय नेहा मॅडम प्रा वर्षा फाटक मदनजी मोडक, मोहिरे साहेब, तसेच डॉक्टर मिठारी या सर्वांनी आपल्या पालकत्वाचे अनुभव आणि लेखकांना शुभेच्छा दिल्या. मेजर प्रकाश पाटील यांनी आपल्या ओघवत्या भाषेत लेखकाने ज्या ताकतीने हे पुस्तक लिहिलेलं आहे त्या ताकतीने पालकांनी हे वाचून त्याचे अनुकरण केले तर निश्चितच तुमची मुलं तुमच्या मनाप्रमाणे मोठी होतील असा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात सुरेश जोशी यांनी लेखकाचे विशेष अभिनंदन करत अशा प्रकारचे समाजोपयोगी लेखन काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा परिषद आदर्श शिक्षक विनय होडे यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन युवाशक्ती प्रमुख कुमारी प्रगती शिंदे यांनी प्रभावीपणे केले.

हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाला.

# ४ मे रोजी ठाणे महापालिका लोकशाही दिनाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, ०४ मे, २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी मे महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २० एप्रिल पर्यंत त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/ सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर- २०१२ पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.



# वंचित बहुजन आघाडीचा कार्यकर्त्यांनी नांदेडमध्ये चुलीवर जेवण बनवून राज्यव्यापी अंदोलन करण्यात आले







दैनिक वादळ वार्ता

**माहूर । प्रतिनिधी**

नांदेड वंचित बहुजन आघाडीच्या पक्षाच्या वतीने सोमवार दिनांक ०६/०४/२०२६ रोजी आयोजित केलेल्या राज्यव्यापी आंदोलनासाठी नांदेड ठिकाणी कार्यालय येथे ठीक आहे १२वाजता आंदोलनाला सुरुवात झाली वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून गॅस सिलेंडरचे दर गगनाला भिडले आहेत. या जनसामान्यांच्या ज्वलंत प्रश्नावर केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज नांदेडमध्ये नरेंदर कब मिलेगा सिलेंडर हे राज्यव्यापी आंदोलन आक्रमकपणे करण्यात आले.

या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे, गॅसच्या वाढीव किमतींचा निषेध करण्यासाठी कार्यकर्त्यांनी चक्क रस्त्यावर चुलीवर जेवण बनवून जिल्हा पुरवठा विभागाचा तीव्र निषेध केला.केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे गृहिणींचे बजेट कोलमडले असून, गरिबांना पुन्हा एकदा चुलीकडे जावे लागत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या आंदोलनानंतर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती:या आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र प्रदेश सदस्य अविनाश भोसीकर, जिल्हाध्यक्ष राज आटकोरे, आणि शंकर महाजन यांनी केले. यावेळी जिल्हा महासचिव दिपक रुद्रजी मगर, रविभाऊ पंडित, जिल्हा उपाध्यक्ष के. एच. वने, तालुकाध्यक्ष बंटीभाऊ मोरे, जिल्हा संघटक संजय टिके, नगरसेवक राहुल सोनसळे, नगरसेवक प्रतिनिधी आकाश जोंधळे, नगरसेवक शेख बिलाल, नगरसेविका जयश्री गोडबोले उर्फ राक्षसमारे आणि नगरसेवक प्रतिनिधी कुलदीप राक्षसमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच वाढवे दादा ढवळे, जिल्हा उपाध्यक्ष (किनवट) दिनेश कांबळे, सखाराम अहंकारे, बंटीभाऊ गायकवाड, जिल्हा सल्लागार प्रल्हाद इंगोले, महानगर अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, विनायक गजभारे (जिल्हा उपाध्यक्ष), रंगनाथ गजले (जिल्हा सचिव), ड. जयपाल ढवळे (कायदेशीर सल्लागार), विद्यानंद पवळे, गणपत सवई सोनकांबळे यांसह वंचित बहुजन आघाडीचे सर्व मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते....या आंदोलनात शेकडो वं.ब.अ.पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तालुक्यातील व जिल्ह्यातील उपस्थित होते, त्यानंतर आंदोलनाची व्यापकता वाढली असता आंदोलनाला सुरुवात झाली.या आंदोलनात नरेंद्र कब मिलेगा सिलेंडर या जोरदार घोषणाबाजी करत सरकारचे चुकीच्या धोरणामुळे महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचे खाजगीकरण, पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडर तुटवड्यामुळे गॅस सिलेंडरच काळा बाजार झाला नाही पाहिजे याकरीता वंचित बहुजन आघाडी पक्षाकडुन राज्यव्यापी आंदोलन घेण्यांत आल, आंदोलन भर उन्हात आक्रमक स्वरूप घेऊन राज्याचे व जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारीनी सरकारच्या चुकीच्या धोरणाविषयी आपले मत मांडुन उपजिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे आपले मत व्यक्त केले की, जिल्ह्यात गॅस सिलेंडर तुटवडा आणि पेट्रोल, डिझेलसाठी पंपवर रांगा न लावु देता जनतेला सेवा मिळाली पाहिजे याकरीता प्रशासनानी दखल घेवून सेवा दिली पाहिजे त्यावर उपजिल्हाधिकारी नांदेड यांना आंदोलनाच निवेदन दिले. निवेदन देणे वेळेस मा प्रा. मधुसिंग जाधव माहुर व ( वंचित बहुजन आघाडीचे ता. माजी महासचिव श्री.दुधरामभाऊ भोजु राठोड कणकीकर )सचिन हट्टकर,किनवट गौतम उमरे (उमरी बा.),दादाराव गायकवाड माहुर,व इतर वं.ब.अ.कार्यकर्ते मा.उपजिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन देणे वेळेसच छायांकीत घेतलेला फोटो या आंदोलनात बरेच वं. ब.अ.कार्यकर्ते सामील झाले हे आंदोलन जिल्ह्य अधिकारी कार्याल्यासमोर चुल पेटवुन आंदोलन करण्यात आल या आंदोलनात सर्व वंचित बहुजन आघाडी चे कार्यकर्त्यांनी सहभागी होते...




## बंजारा एसटी आरक्षणासाठी लाखोच्या संख्येने उपस्थित रहा–सचिन भैय्या राठोड

दैनिक वादळ वार्ता

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एसटी आरक्षण मिळावे या मागणीसाठी महाराष्ट्रातील बंजारा समाज आक्रमक झाला असून बंजारा समाज एस टी आरक्षण मागणी शासन स्तरावर जोर धरत असल्याने बंजारा समाज मुंबई येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे बंजारा समाज एसटी आरक्षण मिळावे यासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर मोर्चाचे आयोजन आठ एप्रिल रोजी करण्यात आले असून बंजारा समाजाचे संघर्ष योध्दा विनोद भाऊ आडे यांनी आवाहन केले असून विनोद भाऊ आडे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील बंजारा समाजाने आठ एप्रिल रोजी मुंबई आझाद मैदानावर लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बंजारा समाजाचे युवा नेतृत्व सचिन भैय्या राठोड यांनी केले आहे आयोजक सकल बंजारा समाज महाराष्ट्र राज्य महाराष्ट्रातील तांडे वाडी वस्तीवरील



बंजारा समाजातील माता भगिनी पुरुष मंडळी युवकांनी या विराट मोर्चात सहभागी होऊन एसटी आरक्षणासाठी उपस्थित राहण्याच्या आव्हान सचिन भैय्या राठोड यांनी केले आहे

## पाथर्डी पंचायत समितीत अश्विनी घाटकर यांची उप अभियंता पदावर नियुक्ती; मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागात उप अभियंता पदावर अश्विनी घाटकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी नुकता०च आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. नियुक्तीप्रसंगी त्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

या वेळी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब खेडकर यांनी अश्विनी घाटकर यांचा सत्कार केला. कार्यक्रमास पाणीपुरवठा शाखेतील देविदास दहिफळे साहेब, संदीप कासार साहेब, पुनम ऊगले मॅडम, अशोक खेडकर सर, अभिषेक हुगे तसेच लघु पाटबंधारे विभागाचे उप अभियंता नंदकिशोर नाकाडे



उपस्थित होते.

अश्विनी घाटकर यांच्या नियुक्तीमुळे पाथर्डी तालुक्यातील पाणीपुरवठा योजनांना गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यभार स्वीकारताना त्यांनी प्रलंबित कामांना प्राधान्य देत नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. तसेच विविध योजना प्रभावीपणे राबवून पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

> **“ पाथर्डी तालुक्यातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करणार आहे. नागरिकांना शुद्ध व नियमित पाणी मिळणे ही माझी प्राथमिकता असेल. सर्वांच्या सहकार्याने प्रलंबित कामे पूर्ण करून नवीन योजनांना गती देईन..**
>
> **–श्रीमती अश्विनी घाटकर उप अभियंता पाथर्डी पंचायत समिती**

## माजी सरपंच पुत्राच्या त्रासाला कंटाळून अल्पवयीन विद्यार्थिनीची आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील मगर वस्तीवर राहणाऱ्या व नुकतीच दहावीची परीक्षा दिलेल्या अनुजा सूर्यकांत मावकर वय १५ वर्षे या विद्यार्थिनीने मंगळवारी दि.७ एप्रिल रोजी रात्री राहत्या घरी दार बंद करून घराच्या छताच्या लोखंडी हुकला ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील मगर वस्तीवर राहणारी विद्यार्थिनी अनुजा सूर्यकांत मगर ही गावातील संस्थेच्या शाळेत गेल्या वर्षी नववी च्या वर्गात शिक्षण घेत असतानाही गावातीलच अक्षय भगवान काळे वय २७ वर्षे हा तीचा सतत पाठलाग करून,तीला बोलण्याचा प्रयत्न करून तीला त्रास देत होता. त्यामूळे तिच्या नातेवाईकाने तीला दहावीच्या वर्षी केज येथील सरस्वती कन्या शाळेत शिक्षणासाठी ठेवले होते.व राहण्याची व्यवस्था वारकरी शिक्षण संस्थेमध्ये केली होती. परंतु तेथेही अक्षय या मुलीचा



पाठलाग करून तीला बोलण्याचा प्रयत्न करीत होता.मंगळवारी दि.७ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान अनुजा मावकरचे आई, वडील हे घराशेजारीच असलेल्या शेतात गेले असताना त्याने मगर वस्तीवर येऊन अनुजाला बोलण्याचा प्रयत्न केला असता अनुजा घरात पळून गेली.परंतु त्यानंतर ती तणावाखालीच होती. रात्री १० वाजता सर्वांचे जेवण झाल्यानंतर अनुजा मावकर हीने राहत्या घरात जाऊन आतून कडी लावून घेतली व छताच्या लोखंडी हुकला ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केली.रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार लक्षात येताच पोलिसांना माहिती देण्यात आली.पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पार्थिव केज उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.बुधवारी अनुजाचे वडील सूर्यकांत तुकाराम मावकर यांच्या फिर्यादी वरून अक्षय भगवान काळे या ट्रॅक्टर चालकाच्या त्रासाला कंटाळानच अनुजा हिने राहत्या घरी ओढणीने गळफास घेवून आत्महत्या केल्या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून केज पोलिसात अक्षय काळे विरुद्ध गून्हा नोंद झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक सुकुमार बनसोडे हे करीत आहेत.

## चालकाला डुलकी लागली अन् रेतीचा टिप्पर पलटी शेळगाव नृसिंह येथील घटना, मोठा अनर्थ टळला

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेवाळा – देगलूर रस्त्यावरील शेळगाव नृसिंह येथे आज ८ एप्रिल रोजी सकाळी ६:३० वा. सुमारास एक भीषण अपघात झाला. रेती वाहतूक करणाऱ्या एका टिप्परच्या चालकाला अचानक डुलकी लागल्याने वाहन थेट रस्त्याच्या कडेला पलटी झाले. ही घटना गावातील हत्ती सर यांच्या घराजवळ घडली असून सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, एम एच २६ बी ई १७०७ क्रमांकाचा टिप्पर सकाळी ६:३० वाजता रेती घेऊन सगरोळी येथुन शेळगाव नृसिंह मार्गावरून देगलूर कडे जात होता. शेळगाव नृसिंह शिवारात हत्ती सर यांच्या निवासस्थानाजवळ टिप्पर आला असता, चालकाला झोप लागल्याने त्याचे



वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव टिप्पर रस्त्याखाली जाऊन पलटी झाला.

पहाटेची वेळ असल्याने आणि सुदैवाने रस्त्यावर व घराबाहेर वर्दळ नसल्याने मोठा अनर्थ टळला आहे. अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. या अपघातात टिप्परचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून चालकाला सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, भविष्यात अशा घटनांमुळे कोणतेही अनुचित प्रकरण किंवा मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. प्रशासनाने या मार्गावरील जड वाहनांच्या वेगावर आणि वाहतुकीच्या नियमांवर नियंत्रण ठेवावे, असेही बोलले जात आहे.

# ओएनजीसी तर्फे ग्रामपंचायत नवघरला नवीन घंटागाडी उपलब्ध

दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत नवघर तर्फे ओएनजीसी कंपनीला घनकचरा उचलण्यासाठी घंटागाडीची मागणी दोन महिन्यापूर्वी ग्रामपंचायत तर्फे मागणी व ठराव सरपंच आणि उपसरपंच यांनी ओएनजीसीला केला होता शिवसेना शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे आणि नितीन मढवी यांनी भेटून विनंती केली की आम्हाला घंटागाडीचे खूप आवश्यकता आहे आपण लवकरात लवकर घंटा गाडीच्या मागणीचा विचार करावा अशी विनंती करण्यात आली.त्यानंतर त्यांनी संस्थेचे कॉन्टॅक्ट नंबर देऊन त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना जे काही पत्र किंवा माहिती पाहिजे सर्व देऊन त्यांनी पण आश्वासित केले होते की तुमच्या मागणीचा लवकरात लवकर विचार केला जाईल. एनजीओ संस्था आणि ओएनजीसी अधिकारी यांच्या सोबत शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे यांनी स्वतः सतत पाठपुरवठा, संपर्क केला. त्यांनी ग्रामपंचायतला नवीन एक चांगली घंटागाडीची व्यवस्था करून दिली.सोमवार दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी ओएनजीसी कंपनी मध्ये या घंटागाडीचे उद्घाटन ओएनजीसी चे प्लांट मॅनेजर एस एन अहमद सर(उत्रह्व) आणि एस के मोहन सपोर्ट मॅनेजर उरण प्लांट यांनी गाडीला हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन केले. यावेळी ओएनजीसी चे अधिकारी अभिषेक पाटील आणि इतर अधिकारी उपस्थित होते. तसेच सरपंच सविता मढवी,उपसरपंच प्रियदर्शनी म्हात्रे, नितीन मढवी, शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे, आतिश भोईर उपस्थित होते.यावेळी ग्रामपंचायतीतर्फे उद्घाटनाला आलेल्या ओएनजीसी अधिकारी यांचे शाल व फुलझाडे देऊन स्वागत करून सत्कार करण्यात आले.ही घंटागाडी उपलब्ध होण्यासाठी ओएनजीसीचे अधिकारी अभिषेक पाटील यांचे खूप मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचे विशेष सत्कार करून ग्रामपंचायत तर्फे आभार मानण्यात आले.तसेच भूमिका फाउंडेशनचे डॉक्टर विशाल गणर यांचे सुद्धा मोलाचे सहकार्य लाभले. शिवसेना शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे यांनी ओएनजीसी अधिकारी आणि एनजीओ संस्थेशी सतत पाठपुरवठा संपर्क करून ओएनजीसी कडून ही नवीन घंटागाडी मिळण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल ग्रामपंचायतीतर्फे त्यांचे सुद्धा मनःपूर्वक आभार मानण्यात आले.



# शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित विडाला ३० लाखांचा नफा

## पतसंस्थेत ६० कोटींच्या ठेवी तर ५० कोटींचे कर्ज वाटप चेअरमन बाबासाहेब मुळे यांची माहिती

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

विडा येथिल शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत ६० कोटींच्या ठेवी असून त्यापैकी पतसंस्थेने एकूण ५० कोटींचे कर्ज वाटप केले आहे. पतसंस्थेने २३ कोटींची गुंतवणूक केली आहे. पतसंस्थेकडे सध्या ४ कोटींचा स्वनिधी आहे. दरम्यान पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाखांचा निव्वळ नफा झाला असून पतसंस्थेच्या विडा,सारूळ(बरड), चिंचोली माळी,येवता, वाघेबाभूळगाव, नेकनूर,धारूर, केज,युसूफ वडगाव,वडवणी, चौसाळा येथे एकूण ११ शाखा कार्यरत आहेत. तसेच पतसंस्था लवकरच ७० कोटींच्या पुढे वाटचाल करणार असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिली आहे.बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे यांनी विडा येथे शिवरामपुरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची स्थापना केली होती. पतसंस्थेने कृष्णा को- ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे व युवा नेते अतुल दादा मुंडे यांच्या मार्गदर्शना खाली ग्राहकांचा विश्वास संपादन करत यशस्वीरित्या वाटचाल केली आहे.त्यामुळे पतसंस्थेने अत्यंत अल्पावधीत ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर उत्तुंग भरारी घेतली असून पतसंस्थेने ६० कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे.पतसंस्थेला उत्तम व्यवस्थापनाबद्दल विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ, खातेदार, ठेवीदार,सभासद,हित चिंतक व ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ६० कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या असून त्यापैकी पतसंस्थेने ५० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.या माध्यमातून पतसंस्थेने कर्जदारांना विविध व्यवसाय उभारून स्वतःच्या पायावर उभे राहण्या साठी मदत केली आहे. दरम्यान पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाखांचा निव्वळ नफा मिळाला आहे. पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुनीता पवार,उपमुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चौरे सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक,सर्व शाखेचे कर्मचारी यांनी उत्तम कर्तव्य बजावत असून पतसंस्था लवकरच ७० कोटींच्या पुढे वाटचाल करणार असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिली आहे.

# नायगावच्या अन्वय चव्हाणला होमी भाभा स्पर्धेत सिल्व्हर मेडल

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हानुमंत चंदनकर**



ग्रामीण मातीतून उगवलेल्या प्रतिभेने पुन्हा एकदा राज्याच्या पटलावर आपला ठसा उमटवला आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पार पडलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत नायगावच्या अन्वय धनराज चव्हाण याने उल्लेखनीय कामगिरी करत सिल्वर मेडल पटकावले. विज्ञानाच्या क्षेत्रात लहान वयातच गवसलेले हे यश नायगावसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

शांकुतल स्कूल फॉर एक्सलन्स (CBSC School), पासदगाव नांदेड, जि. नांदेड येथील इयत्ता सहावीचा विद्यार्थी असलेल्या अन्वयने Mission Zero Waste या अभिनव प्रकल्पातून 3R (Reduce, Reuse, Recycle) या संकल्पनेची प्रभावी मांडणी केली. वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर उपाय शोधत त्याने प्लास्टिकचा पुनर्वापर, टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती आणि पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश सादर केला. त्याच्या प्रयोगातील वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि सादरीकरणातील आत्मविश्वास यामुळे परीक्षकांची दाद मिळाली.विशेष म्हणजे, ग्रामीण पार्श्वभूमीतून येऊन राज्यस्तरीय स्पर्धेत मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अन्वयच्या या यशामागे त्याचे कष्ट, जिद्द आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.अन्वयच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद, आई-वडील तसेच संपूर्ण परिसरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. विज्ञानाच्या वाटेवर झेप घेतलेल्या या चिमुकल्याने नायगावचे नाव उज्ज्वल करत भविष्यातील मोठ्या यशाची नांदी दिली आहे.

# राष्ट्रीय लोककलावंत दिव्यांग निराधार संघर्ष जिल्हासमितीवर रज्जाक शेख

**दैनिक वादळ वार्ता**
**श्रीरामपूर । प्रतिनिधी**




राष्ट्रीय स्तरावर लोककलावंत दिव्यांग निराधार समिती लोककलावंतांच्या न्याय व हक्कासाठी संघटन उभे करून सर्व कलावंतांना एकाच छत्राखाली आणून त्यांची कला शासन दरबारी जीवंत ठेवून त्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करते. उपक्रम घेऊन कलेची आवड निर्माण करून ग्रामीण भागातील कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. अश्या राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या लोककलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या अहिल्यानगर जिल्हाकार्याक्षपदी ग्रामीण कवी, मराठी लेखक, साहित्यिक तथा अभिनेता रज्जाकभाई शेख यांची निवड करण्यात आली. श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात समितीचे राष्ट्रीय संस्थापक संदीपकुमार बोरकर यांनी विभागीय अध्यक्ष सुभाष सोनवणे,अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष नानासाहेब डोंगरे, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष ग्रामीण कवी आनंदा साळवे यांच्या उपस्थितीत निवडीचे पत्र दिले.यावेळी श्रीरामपूर शाखेच्या फलकाचे अनावरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी समितीची ध्येयधोरणे आणि इतिहास मांडण्यात आला. अनावरण प्रसंगी सुनीता वाळुंज,श्वेता सावंत,वसंत साळवे,सत्तार शेख,बाळासाहेब मनतोडे,शैला मुंतोडे,दिगंबर गोंधळी,कल्पना निंबोकार आणि पिंगळा,डवरी गोसावी,बहुरूपी, पोतराज, भराडी, वासुदेव,आराधी,वाघे मुरळी आधी लोककलावंत मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.रज्जाक शेख यांच्या वडिलांचा लोककलावंत वारसा पुढे नेत असल्याबद्दल आणि जिल्हा समितीवर निवडीप्रसंगी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# प्रगतशील शेतकरी राहुल पाटील नकाते पारंपारिक पद्धतीने बैलाची शेती पुजन करून शेती कामाचा शुभारंभर

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हानुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील बेटकबिलोली येथे आज दिनांक ८ एप्रिल रोजी सर्व शेतकऱ्यांनी मिळून पारंपारिक शेती मुहूर्त शेती पूजन करून शेती कामाचा शुभारंभ करण्यात आला पारंपारिक पद्धतीने शेतीची आंबील पारंपरिक बैलांचा औत जुंपून बैल पूजन व शेतीची हळद-कुंकू लावून पूजा आरती व नैवेद दाखवून पारंपारिक भोजन आंबील हिरवी भाजी फळ भाकरी शेती मातीला नैवेद्य दाखवून मित्रांना निमंत्रण देऊन पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना शुभारंभ करण्यात आला बेटकबिलोली येथील प्रगत शेतकरी श्री राहुल



पाटील नकाते यांच्या शेतात पारंपारिक सांस्कृतिक जपत शेती कामाचा शुभारंभ करण्यात आला.

# नेत्रतज्ज्ञ डॉ.दत्तात्रय नेहरकर यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील पिसेगाव येथील नामांकित नेत्रतज्ज्ञ डॉ.दत्तात्रय नेहरकर यांचे दि.७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता केज येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले.डॉ.नेहरकर यांनी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात अनेक वर्षे अत्यंत निष्ठेने आणि सेवाभावी वृत्तीने नेत्रतज्ज्ञ म्हणून रुग्णसेवा बजावली होती.त्यांच्या जाण्याने वैद्यकीय क्षेत्रात आणि अंबाजोगाई-केज, बीड परिसरात मोठी शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. डॉ.नेहरकर यांच्या पार्थिवावर बुधवार,दि.८ एप्रिल रोजी सकाळी त्यांच्या पिसेगा या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठीत मंडळी,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाच वृत्त समजताच परिसरावर शोककळा पसरली आहे. शांत,संयमी व्यक्तीमत्व यामुळे ते सर्व परिचित होते.

# काँग्रेस संघटन सृजन अभियानांतर्गत कार्यकर्त्यांची बैठक उत्साहात

**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपुर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने देशभर राबविण्यात येत असलेल्या 'संघटन सृजन अभियान' अंतर्गत राजुरा येथे कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला तालुका व शहरातील मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली.छत्रपती शिवाजी महाराज संकुल (सुपर मार्केट हॉल), राजुरा येथे आयोजित या बैठकीत संघटन बळकटीकरणावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक जिल्हा व तालुक्यात पक्षाची पकड मजबूत करण्यासाठी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे निरीक्षक संतोष कोल्हेकोडा, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे निरीक्षक अभय छाजेड, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष याशिम शेख, खासदार प्रतिभाताई धानोरकर, तसेच जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिंपरी तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी, प्रमुख नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी निवडणुका व पक्षविस्ताराच्या दृष्टीने रणनीती ठरविण्यात आली.

# आरणगाव येथे ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या अमृततुल्य किर्तनाने काल्याची सांगता व गिरीजादेवी मुर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**


केज तालुक्यातील आरणगाव येथे गेल्या वर्षाची परंपरा अखंडित ठेवत गावकऱ्यांनी तसेच यावेळी गिरीजादेवी मुर्ती प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहाने सहभागी सात दिवसांपासून चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शिवरामपुरी मठ संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या अमृततुल्य कीर्तनाने सांगता संपन्न झाली. तसेच परिसरातील व राजकीय,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी गावकऱ्यांच्या वतीने गेल्या सात दिवसांपासून गावामध्ये सप्ताह चालू होता.या सप्ताहासाठी सात दिवस टाळकरी,



मृदंगाचार्य,विणेकरी यानी मनोभावे सेवा केल्याने सर्वांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.यावेळी महाराजांनी गावकऱ्यांचे कौतुक करून असेच कार्य आपल्या हातून होवो अशी इच्छा व्यक्त केली हा अनोखा कार्यक्रम आपण आज या ठिकाणी पहिल्यांदा पाहत असल्याचेही त्यांनी मत व्यक्त केले. जमलेल्या भाविकांना व्यसनापासून मुक्त व्हा सल्ला महाराजांनी दिला, कारण व्यसनापासून अनेकांचे संसार उध्वस्त झालेले आहेत.यामुळे जमलेले सर्व भाविक भक्तांना व्यसनाच्या आहारी न जाता परमार्थात येऊन आपले आयुष्य सुखीसमाधानाने जगावे असा संदेश यावेळी महाराजांनी दिला.व आरणगाव येथील गिरीजामंदिर परिसरात संपन्न झाला.

# माजलगावात महात्मा फुले जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रम; डॉ.रामपाल महाराज धारकर यांचे व्याख्यान

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सत्यशोधक विचारांची प्रेरणा देणाऱ्या या कार्यक्रमात समाज प्रबोधनकार डॉ. रामपाल महाराज धारकर यांचे व्याख्यान होणार असून भारताच्या संविधानाचेही वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच अजय शिंदे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी युवा नेते दत्ता विसवळे राहणार आहेत. तसेच बाबुराव पोटभरे, माधव तात्या निर्मळ, ज्ञानेश्वर मेंडके, तुकाराम बापू येवले, कल्याणराव आबुज, डॉ. अशोक तिडके यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.सामाजिक जागृती आणि समतेचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, किशोर पांचाळ यांनी केले आहे.

# वाघोरा येथील भीमजयंती कार्यकारिणी जाहीर

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील वाघोरा येथे दरवर्षीप्रमाणे विश्वभूषण महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बैठक घेऊन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली ती पुढीलप्रमाणे अध्यक्षपदी इंजि.शुभम भास्करराव माने, उपाध्यक्ष राहुल रामकिसन माने, सचिव अक्षय शिरसाट, सहसचिव ऋषिकेश माने, खजिनदार शंकर माने, कोषाध्यक्ष यशपाल मोरे, आदींचा समितीमध्ये समावेश आहे. बैठकीला उपस्थित ग्रामपंचायत सदस्य राहुल शिरसाठ, अण्णाभाऊ माने ज्ञानेश्वर माने, सुंदर माने, मनोहर माने, बबन माने, सिद्धार्थ माने, कारभारी माने, श्रीमंत माने, भागवत माने, उत्तम माने, बाळू मोरे, राहुल मोरे, प्रमोद माने, संभाजी सपाटे, नितीन शिरसाट, दीपक भिसे, नितीन मकरंद, दादा ससाने, प्रेमकुमार माने , यांच्यासह मोठ्या संख्येने गावातील नागरिक उपस्थित बैठक पार पडली. तसेच जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, रांगोळी स्पर्धा, भाषण स्पर्धा, भीम गीतांचा ऑर्केस्ट्रा तर २७ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या गजरात फुलांची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077